0 9 AUG 2026

पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या आठ विद्यार्थ्यांची निवड

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) वतीने घेतलेल्या सांख्यिकी अधिकारी/ संशोधन अधिकारीपदाच्या भरती प्रक्रियेत शिवाजी विद्यापीठाच्या आठ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

यामध्ये पृथ्वीराज झांबरे, आदिनाथ पाटील, रवींद्र देवरे, सोनम पाटील, निकेत जाधव, स्वनील माने, तेजश्री राजे, विद्या वालकोळी यांचा समावेश आहे. त्यांना अधिविभागाचे प्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक यांच्यासह शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. या भरती प्रक्रियेत राज्यभरातून निवड झालेल्या २५ पैकी शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातील आठ विद्यार्थ्यांची निवड झाली असून, हे प्रमाण ३२ टक्के इतके आहे.

दरम्यान, संख्याशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये सातत्याने आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. केंद्र व राज्य शासनासह खासगी क्षेत्रांतही विविध पदांवर विद्यापीठाचे विद्यार्थी आहेत. आठ विद्यार्थ्यांच्या यशामुळे अधिविभागातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता नव्याने अधोरेखित झाल्याचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी सांगितले.

0 9 AUG 2026
पुढारी

# विद्यापीठाच्या आठ विद्यार्थ्यांची सांख्यिकी अधिकारीपदी निवड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सांख्यिकी अधिकारी, संशोधन अधिकारी (गट-ब, राजपत्रित) भरती प्रक्रियेत शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातील आठ विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळविले आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये पृथ्वीराज झांबरे, आदिनाथ पाटील, रवींद्र देवरे, सोनम पाटील, निकेत जाधव, स्वप्निल माने, तेजश्री राजे आणि विद्या वालकोळी यांचा समावेश आहे. अधिविभागप्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक व शिक्षकांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. संख्याशास्त्र अधिविभागाचे अनेक माजी विद्यार्थी केंद्र व राज्य शासनातील महत्त्वाच्या पदांवर कार्यरत आहेत. या यशाबद्दल कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

0 9 AUG 2026

पुढारी

# 'विद्यापीठात साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे लेखन प्रेरणा दिन साजरा करा'

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचा १ ऑगस्ट हा जन्मदिवस शिवाजी विद्यापीठ तसेच संलग्न सर्व महाविद्यालयांमध्ये दरवर्षी साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे लेखन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात यावा, अशी मागणी मानवतावादी सांस्कृतिक चळवळीच्या वतीने कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

अण्णा भाऊ साठे यांचा जन्म शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे झाला. त्यांच्या साहित्य व विचारांच्या अभ्यास, संशोधन व संवर्धनासाठी विद्यापीठाने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा करण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचन, लेखन, संशोधनाची आवड आणि सामाजिक जाणिवा अधिक दृढ होतील, असेही निवेदनात म्हटले आहे. यावेळी मदन पवार, अनिल म्हमाने, प्रा. किसनराव कुराडे, डॉ. कपिल राजहंस, डॉ. वसंत भागवत, अंतिमा कोल्हापूरकर, सुनील जाधव व अश्वजित तरटे आदी उपस्थित होते.

09 AUG 2026 सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मातृदेवतांमध्ये संस्कृती वाटचालीच्या पाऊलखुणा : स्नेहा टोणपे



कोल्हापूर/प्रतिनिधी : मातृदेवतांमध्ये संस्कृती वाटचालीच्या पाऊलखुणा असतात, असे प्रतिपादन लोकसंस्कृतीच्या अभ्यासक डॉ. स्नेहा टोणपे यांनी नुकतेच केले. त्या शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागात 'शोध मातृदेवतांचा' या विषयावरील विशेष व्याख्यानात प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या.

मातृदेवतांचे एकूणच व्यापक स्वरूप जटील आणि व्यामिश्र स्वरूपाचे असल्याचे सांगून डॉ. टोणपे म्हणाल्या, शेती, जल, संस्कृतीची विविध रूपे मातृदेवतांत दिसून येतात. त्याचप्रमाणे संस्कृती उत्क्रांतीच्या अनेक पाऊलखुणाही त्यांच्यामध्ये आढळतात.

मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, मातृदेवतांची चिकित्सा करणे आणि मातृदेवतांच्या अभ्यासाकडे आजच्या संशोधक विद्यार्थ्यांनी नवदृष्टीने पाहिले पाहिजे. मानवी अस्तित्वाच्या अनेक खुणा मातृदेवतांच्या अभ्यासातून शोधता येतात. तसा दृष्टीकोन ठेवून संशोधन विद्यार्थ्यांनी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. नंदकुमार मोरे प्रमुख उपस्थित होते. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. कार्यक्रमास विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

0 8 AUG 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# विद्यापीठात क्रांती दिनानिमित्त स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन

**कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज) :**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील ऐतिहासिक क्रांती दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात स्वातंत्र्यसैनिकांना आणि हुतात्म्यांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन करण्यात आले. विद्यापीठ परिसरातील क्रांतीवन येथे हा कार्यक्रम झाला.



आज सकाळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी क्रांतीवनातील स्मृतीस्तंभाला पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी सर्व उपस्थितांनी कवी कुसुमाग्रज यांच्या अनाम वीरा... या अजरामर देशभक्तीपर गीताचे सामूहिक वाचन केले. डॉ. भारती पाटील यांनी याचे संयोजन केले. कुलगुरू डॉ. कामत यांनी देशसेवेसाठी सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मृतींना उजाळा दिला. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनीही क्रांतीदिनाचे महत्त्व सांगत देशाच्या प्रगतीसाठी सर्वांनी योगदान देण्याचे आवाहन केले.

या वेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सावलीराम घाणे, डॉ. शशीभूषण महाडिक, डॉ. सोमनाथ पवार, डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. संजय चोपडे, सुरक्षा अधिकारी वसंत एकले, सुरेखा अडके यांच्यासह प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

08 AUG 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimat Corner Appartment, Kolhapur,
Mob.- 9175089609

# मास मीडियातून जनहिताला प्राधान्य द्या : प्रा. डॉ. ज्योती जाधव

**कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज) :**

समाजात मास मीडियाची भूमिका महत्त्वाची असून विविध माध्यमात नवनियुक्त झालेल्या विद्यार्थ्यांनी सामाजिक हिताला प्राधान्य द्यावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने नुकत्याच विविध माध्यमातून जॉईन झालेल्या विद्यार्थ्यांच्या गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्या बोलत होत्या. बीबीसी न्यूज मराठीला निवड झाल्याबद्दल साई सिमरन घाशी या विद्यार्थिनीचा प्रा. डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. गेल्या तीन वर्षात मास कम्युनिकेशन विभागाचे तीसहून अधिक विद्यार्थी स्थानिक पातळीपासून



राष्ट्रीय पातळीवरच्या माध्यमात जॉईन झाले आहेत.

प्रस्ताविक मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. यावेळी सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

08 AUG 2026

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimit Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# मातृदेवतांमध्ये संस्कृती वाटचालीच्या पाऊलखुणा: स्नेहा टोणपे



कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज) :

मातृदेवतांमध्ये संस्कृती वाटचालीच्या पाऊलखुणा असतात, असे प्रतिपादन लोकसंस्कृतीच्या अभ्यासक डॉ. स्नेहा टोणपे यांनी नुकतेच केले. त्या शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागात 'शोध मातृदेवतांचा' या विषयावरील विशेष व्याख्यानात प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या.

मातृदेवतांचे एकूणच व्यापक स्वरूप जटील आणि व्यामिश्र स्वरूपाचे असल्याचे सांगून डॉ. टोणपे म्हणाल्या, शेती, जल, संस्कृतीची विविध रूपे मातृदेवतांत दिसून येतात. त्याचप्रमाणे संस्कृती उत्क्रांतीच्या अनेक पाऊलखुणाही त्यांच्यामध्ये आढळतात.

मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, मातृदेवतांची चिकित्सा करणे आणि मातृदेवतांच्या अभ्यासाकडे आजच्या संशोधक विद्यार्थ्यांनी नवदृष्टीने पाहिले पाहिजे. मानवी अस्तित्वाच्या अनेक खुणा मातृदेवतांच्या अभ्यासातून शोधता येतात. तसा दृष्टीकोन ठेवून संशोधन विद्यार्थ्यांनी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. नंदकुमार मोरे प्रमुख उपस्थित होते. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. कार्यक्रमास विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक 0 8 AUG 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सातारा न्यूज

निर्भीड व निष्पक्ष बातमी देणारं एकमेव व्यासपीठ

# लोकशाहीर अणणाभाऊ साठे मानवतावादी लेखक व विचारवंत : डॉ. श्रीपाल सबनीस

सातारा : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे छत्रपती शिवाजी महाराज, कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा समन्वय साधणारे जगातील पहिले साहित्यिक असून ते मूलतः मानवतावादी विचारवंत आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासनाच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची सांस्कृतिक भूमिका' या विषयावरील एकदिवसीय चर्चासत्रात बीजभाषक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे होते. अध्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ. ए. एम. सरवदे यांनी चर्चासत्राचे नेटके नियोजन केले.

यावेळी प्रा. डॉ. मेघा पानसरे, डॉ. आलोक जत्राटकर आणि प्रा. डॉ. अंबादास सकट हे साधन व्यक्ती तर सत्राध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. गिरीष मोरे उपस्थित होते. यावेळी डॉ. ललिता सबनीस, डॉ. किसनराव कुराडे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. शरद गायकवाड आणि डॉ. मच्छिंद्र गोफणे यांची विशेष उपस्थिती होती.



डॉ. श्रीपाल सबनीस पुढे म्हणाले की, विश्वकल्याण आणि मानवतावाद हे अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे खरे वैभव आहे. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना स्वातंत्र्य व सामाजिक परिवर्तनाचे उद्गाते मानले. त्यांचा मार्क्सवाद उदारमतवादी असून त्यांच्या साहित्यामध्ये शोषण, जातिव्यवस्था, भांडवलशाही, ब्राह्मण्यवाद आणि विषमतावादी व्यवस्थेविरुद्धचा संघर्ष प्रकर्षाने दिसून येतो. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतही अण्णाभाऊ साठे यांनी लोकशाहीर व साहित्यिक म्हणून मोलाचे योगदान दिले. त्यांचे साहित्य एका समाजापुरते मर्यादित नसून विश्वमानवतेचा संदेश देणारे आहे, असेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी अण्णाभाऊ साठे हे सर्वसामान्य माणसाच्या सन्मानासाठी लेखणी चालविणारे लेखक असल्याचे सांगितले. त्यांच्या साहित्याचा गाभा स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठा असून त्यांचे साहित्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अभ्यासले पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.

चर्चासत्रात प्रा. डॉ. मेघा पानसरे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे अनेक दाखले देत ते आंतरराष्ट्रीय दर्जाचे साहित्यिक असल्याचे प्रतिपादन केले. डॉ. आलोक जत्राटकर यांनी ते फुले-आंबेडकरी विचार पुढे घेऊन जाणारे लेखक असल्याचे मत व्यक्त केले. तर किसन वीर महाविद्यालयातील प्रा. डॉ. अंबादास सकट यांनी अण्णाभाऊ साठे यांच्याबद्दल महाराष्ट्राचे शेक्सपियर असे गौरवोद्गार काढले.

प्रास्ताविकात प्रा. डॉ. ए. एम. सरवदे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या सांस्कृतिक भूमिकेचा आढावा घेत मोजक्या शब्दात चर्चासत्राचा उद्देश स्पष्ट केला. इंग्रजी विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रभंजन माने यांनी उद्घाटन सत्राचे आभार मानले. यावेळी अनिकेत कांबळे या इंग्रजी विभागातील विद्यार्थ्याने अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन व कार्यावर आधारित रॅप गीत सादर केले. चर्चासत्रास विद्यापीठ क्षेत्र तसेच पंचक्रोशीतील शिक्षक, विद्यार्थी आणि विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

0 8 AUG 2026


दैनिक जनप्रभात

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

page 3 Aug 2026

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे मानवतावादी लेखक व विचारवंत : डॉ. श्रीपाल सबनीस



**कोल्हापूर :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची सांस्कृतिक भूमिका या विषयावर शिवाजी विद्यापीठात चर्चासत्र उत्साहात संपन्न. प्रा. डॉ. मेघा पानसरे, डॉ. आलोक जत्राटकर आणि प्रा. डॉ. अंबादास सकट यांचे चर्चासत्राचे साधन व्यक्ती म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे छत्रपती शिवाजी महाराज, कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा समन्वय साधणारे जगातील पहिले साहित्यिक असून ते मूलतः मानवतावादी विचारवंत आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासनाच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची सांस्कृतिक भूमिका' या विषयावरील एकदिवसीय चर्चासत्रात बीजभाषक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे होते. अध्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ. ए. एम. सरवदे यांनी चर्चासत्राचे नेटके नियोजन केले.

यावेळी प्रा. डॉ. मेघा पानसरे, डॉ. आलोक जत्राटकर आणि प्रा. डॉ. अंबादास सकट हे साधन व्यक्ती तर सत्राध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. गिरीष मोरे उपस्थित होते. यावेळी डॉ. ललिता सबनीस, डॉ. किसनराव कुराडे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. शरद गायकवाड आणि डॉ. मच्छिंद्र गोफणे यांची विशेष उपस्थिती होती.

डॉ. श्रीपाल सबनीस पुढे म्हणाले की, विश्वकल्याण आणि मानवतावाद हे अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे खरे वैभव आहे. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना स्वातंत्र्य व सामाजिक परिवर्तनाचे उद्गाते मानले. त्यांचा मार्क्सवाद उदारमतवादी असून त्यांच्या साहित्यामध्ये शोषण, जातिव्यवस्था, भांडवलशाही, ब्राह्मण्यवाद आणि विषमतावादी व्यवस्थेविरुद्धचा संघर्ष प्रकर्षाने दिसून येतो. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतही अण्णाभाऊ साठे यांनी लोकशाहीर व साहित्यिक म्हणून मोलाचे योगदान दिले. त्यांचे साहित्य एका समाजापुरते मर्यादित नसून विश्वमानवतेचा संदेश देणारे आहे, असेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी अण्णाभाऊ साठे हे सर्वसामान्य माणसाच्या सन्मानासाठी लेखणी चालविणारे लेखक असल्याचे सांगितले. त्यांच्या साहित्याचा गाभा स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठा असून त्यांचे साहित्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अभ्यासले पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.

0 8 AUG 2026

ग्रामोध्दार
१९३५ पासून

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे मानवतावादी लेखक व विचारवंत : डॉ. श्रीपाल सबनीस

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची सांस्कृतिक भूमिका या विषयावर शिवाजी विद्यापीठात चर्चासत्र उत्साहात संपन्न. प्रा. डॉ. मेघा पानसरे, डॉ. आलोक जत्राटकर आणि प्रा. डॉ. अंबादास सकट यांचे चर्चासत्राचे साधन व्यक्ती म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन



ग्रामोध्दार वृत्तसेवा

**सातारा:** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे छत्रपती शिवाजी महाराज, कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा समन्वय साधणारे जगातील पहिले साहित्यिक असून ते मूलतः मानवतावादी विचारवंत आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासनाच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित मलोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची सांस्कृतिक भूमिकाफ या विषयावरील एकदिवसीय चर्चासत्रात बीजभाषक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे होते. अध्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ. ए. एम. सरवदे यांनी चर्चासत्राचे नेटके नियोजन केले.

यावेळी प्रा. डॉ. मेघा पानसरे, डॉ. आलोक जत्राटकर आणि प्रा. डॉ. अंबादास सकट हे साधन व्यक्ती तर सत्राध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. गिरीष मोरे उपस्थित होते. यावेळी डॉ. ललिता सबनीस, डॉ. किसनराव कुराडे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. शरद गायकवाड आणि डॉ. मच्छिंद्र गोफणे यांची विशेष उपस्थिती होती.

डॉ. श्रीपाल सबनीस पुढे म्हणाले की, विश्वकल्याण आणि मानवतावाद हे अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे खरे वैभव आहे. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना स्वातंत्र्य व सामाजिक परिवर्तनाचे उद्गाते मानले. त्यांचा मार्क्सवाद उदारमतवादी असून त्यांच्या साहित्यामध्ये शोषण, जातिव्यवस्था, भांडवलशाही, ब्राह्मण्यवाद आणि विषमतावादी व्यवस्थेविरुद्धचा संघर्ष प्रकर्षाने दिसून येतो. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतही अण्णाभाऊ साठे यांनी लोकशाहीर व साहित्यिक म्हणून मोलाचे योगदान दिले. त्यांचे साहित्य एका समाजापुरते मर्यादित नसून विश्वमानवतेचा संदेश देणारे आहे, असेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी अण्णाभाऊ साठे हे सर्वसामान्य माणसाच्या सन्मानासाठी लेखणी चालविणारे लेखक असल्याचे सांगितले. त्यांच्या साहित्याचा गाभा स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठा असून त्यांचे साहित्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अभ्यासले पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.

चर्चासत्रात प्रा. डॉ. मेघा पानसरे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे अनेक दाखले देत ते आंतरराष्ट्रीय दर्जाचे साहित्यिक असल्याचे प्रतिपादन केले. डॉ. आलोक जत्राटकर यांनी ते फुले-आंबेडकरी विचार पुढे घेऊन जाणारे लेखक असल्याचे मत व्यक्त केले. तर प्रा. डॉ. अंबादास सकट यांनी अण्णाभाऊ साठे यांच्याबद्दल महाराष्ट्राचे शेक्सपियर असे गौरवोद्गार काढले.

प्रास्ताविकात प्रा. डॉ. ए. एम. सरवदे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या सांस्कृतिक भूमिकेचा आढावा घेत मोजक्या शब्दात चर्चासत्राचा उद्देश स्पष्ट केला. इंग्रजी विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रभंजन माने यांनी उद्घाटन सत्राचे आभार मानले. यावेळी अनिकेत कांबळे या इंग्रजी विभागातील विद्यार्थ्याने अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन व कार्यावर आधारित रॅप गीत सादर केले. चर्चासत्रास विद्यापीठ क्षेत्र तसेच पंचक्रोशीतील शिक्षक, विद्यार्थी आणि विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

08 AUG 2026
दैनिक मुक्तागिरी

# अण्णाभाऊ साठे हे मानवतावादी लेखक व विचारवंत : डॉ. सबनीस



कोल्हापूर : आयोजित चर्चासत्रात बोलताना डॉ. श्रीपाल सबनीस

मुक्तागिरी वृत्तसेवा

कोल्हापूर, दि. ७ : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे छत्रपती शिवाजी महाराज, कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा समन्वय साधणारे जगातील पहिले साहित्यिक असून ते मूलतः मानवतावादी विचारवंत आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासनाच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची सांस्कृतिक भूमिका या विषयावरील एकदिवसीय चर्चासत्रात बीजभाषक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे होते. अध्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ. ए. एम. सरवदे यांनी चर्चासत्राचे नेटके नियोजन केले.

यावेळी प्रा. डॉ. मेधा पानसरे, डॉ. आलोक जत्राटकर आणि प्रा. डॉ. अंबादास सकट हे साधन व्यक्ती तर सत्राध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. गिरीष मोरे उपस्थित होते. यावेळी डॉ. ललिता सबनीस, डॉ. किसनराव कुराडे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. शरद गायकवाड आणि डॉ. मच्छिंद्र गोफणे यांची विशेष उपस्थिती होती.

डॉ. श्रीपाल सबनीस पुढे म्हणाले की, विश्वकल्याण आणि मानवतावाद हे अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे खरे वैभव आहे. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना स्वातंत्र्य व सामाजिक परिवर्तनाचे उद्गाते मानले. त्यांचा मार्क्सवाद उदारमतवादी असून त्यांच्या साहित्यामध्ये शोषण, जातिव्यवस्था, भांडवलशाही, ब्राह्मण्यवाद आणि विषमतावादी व्यवस्थेविरुद्धचा संघर्ष प्रकर्षाने दिसून येतो. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतही अण्णाभाऊ साठे यांनी लोकशाहीर व साहित्यिक म्हणून मोलाचे योगदान दिले. त्यांचे साहित्य एका समाजापुरते मर्यादित नसून विश्वमानवतेचा संदेश देणारे आहे, असेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी अण्णाभाऊ साठे हे सर्वसामान्य माणसाच्या सन्मानासाठी लेखणी चालविणारे लेखक असल्याचे सांगितले. त्यांच्या साहित्याचा गाभा स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठा असून त्यांचे साहित्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अभ्यासले पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.

चर्चासत्रात प्रा. डॉ. मेधा पानसरे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे अनेक दाखले देत ते आंतरराष्ट्रीय दर्जाचे साहित्यिक असल्याचे प्रतिपादन केले. डॉ. आलोक जत्राटकर यांनी ते फुले-आंबेडकरी विचार पुढे घेऊन जाणारे लेखक असल्याचे मत व्यक्त केले. तर किसन वीर महाविद्यालयातील प्रा. डॉ. अंबादास सकट यांनी अण्णाभाऊ साठे यांच्याबद्दल "महाराष्ट्राचे शेक्सपियर" असे गौरवोद्गार काढले.

प्रास्ताविकात प्रा. डॉ. ए. एम. सरवदे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या सांस्कृतिक भूमिकेचा आढावा घेत मोजक्या शब्दात चर्चासत्राचा उद्देश स्पष्ट केला. इंग्रजी विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रभंजन माने यांनी उद्घाटन सत्राचे आभार मानले.

यावेळी अनिकेत कांबळे या इंग्रजी विभागातील विद्यार्थ्याने अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन व कार्यावर आधारित रॅप गीत सादर केले. चर्चासत्रास विद्यापीठ क्षेत्र तसेच पंचक्रोशीतील शिक्षक, विद्यार्थी आणि विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 AUG 2026

सत्यशोधक महाराष्ट्र न्यूज.
सत्यशोधक महाराष्ट्र NEWS
सर्वसामान्यांच्या हक्कासाठी न्यायासाठी
शनिवार, ०८ ऑगस्ट, सातारा.
मुख्य संपादक अमर बनसोडे पाटील
९०९६४४३८८२/९८६०१९२७७४.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे मानवतावादी लेखक व विचारवंत : डॉ. श्रीपाल सबनीस.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची सांस्कृतिक भूमिका या विषयावर शिवाजी विद्यापीठात चर्चासत्र उत्साहात संपन्न. प्रा. डॉ. मेघा पानसरे, डॉ. आलोक जत्राटकर आणि प्रा. डॉ. अंबादास सकट यांचे चर्चासत्राचे साधन व्यक्ती म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन.



कोल्हापूर : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे छत्रपती शिवाजी महाराज, कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा समन्वय साधणारे जगातील पहिले साहित्यिक असून, ते मूलतः मानवतावादी विचारवंत होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासनाच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची सांस्कृतिक भूमिका' या विषयावर आयोजित एकदिवसीय चर्चासत्रात ते बीजभाषक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

डॉ. सबनीस म्हणाले की, विश्वकल्याण आणि मानवतावाद हे अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे खरे वैभव आहे. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सामाजिक परिवर्तनाचे उद्गाते मानले. त्यांच्या साहित्यामध्ये शोषण, जातिव्यवस्था, भांडवलशाही, ब्राह्मण्यवाद आणि विषमतावादी व्यवस्थेविरोधातील संघर्ष ठळकपणे दिसतो. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही अण्णाभाऊ साठे यांनी लोकशाहीर आणि साहित्यिक म्हणून महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांचे साहित्य कोणत्याही एका समाजापुरते मर्यादित नसून विश्वमानवतेचा संदेश देणारे आहे.

अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी अण्णाभाऊ साठे हे सर्वसामान्य माणसाच्या सन्मानासाठी लेखणी चालविणारे लेखक असल्याचे सांगितले. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठा हा त्यांच्या साहित्याचा गाभा असून, त्यांच्या साहित्याचा राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर अभ्यास होणे आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले.

चर्चासत्रात प्रा. डॉ. मेघा पानसरे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे विविध दाखले देत ते आंतरराष्ट्रीय दर्जाचे साहित्यिक असल्याचे सांगितले. डॉ. आलोक जत्राटकर यांनी अण्णाभाऊ साठे हे फुले-आंबेडकरी विचार पुढे नेणारे लेखक असल्याचे मत व्यक्त केले. तर किसन वीर महाविद्यालयातील प्रा. डॉ. अंबादास सकट यांनी अण्णाभाऊ साठे यांचा गौरव 'महाराष्ट्राचे शेक्सपियर' असा केला.

चर्चासत्राचे समन्वयक प्रा. डॉ. ए. एम. सरवदे यांनी प्रास्ताविकातून चर्चासत्राचा उद्देश स्पष्ट केला. सत्राध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. गिरीष मोरे उपस्थित होते. यावेळी डॉ. ललिता सबनीस, डॉ. किसनराव कुराडे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. शरद गायकवाड आणि डॉ. मच्छिंद्र गोफणे यांची विशेष उपस्थिती होती.

इंग्रजी विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रभंजन माने यांनी उद्घाटन सत्राचे आभार मानले. यावेळी इंग्रजी विभागातील विद्यार्थी अनिकेत कांबळे याने अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन व कार्यावर आधारित रॅप गीत सादर केले. चर्चासत्रास विद्यापीठ परिसर तसेच पंचक्रोशीतील शिक्षक, विद्यार्थी आणि विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.